# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यघटना स्वीकृतीच्या अमृत महोत्सवानिमित्त लोकसभेत संविधानावर विशेष चर्चा–पंतप्रधान आज उत्तर देणार
- भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी होईल–वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेत मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४च्या सॉफ्टवेअर फेरीत राज्यातल्या संघांची चमकदार कामगिरी
- ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाला आजपासून प्रारंभ

आणि

- बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग

****

राज्यघटना स्वीकृतीच्या अमृत महोत्सवानिमित्त लोकसभेत कालपासून संविधानावर विशेष चर्चेला सुरुवात झाली. या चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर देणार आहेत. दरम्यान, संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी काल या चर्चेला प्रारंभ केला. देशाचं संविधान हा फक्त एखादा दस्तऐवज नसून, नागरिकांच्या आकांक्षांची अभिव्यक्ती असल्याचं, राजनाथसिंह यांनी नमूद केलं. नागरिकांनी तयार केलेलं हे संविधान, भारतीय मूल्यांवर आधारित असल्याचं, राजनाथसिंह म्हणाले.

काँग्रेसच्या प्रियंका गांधी यांनी या चर्चेत भाग घेत, संविधान हे नागरिकांच्या संरक्षणाचं सुरक्षा कवच तसंच न्याय, एकता आणि अभिव्यक्तीच्या अधिकाराचं कवच असल्याचं मत व्यक्त केलं.

समाजवादी पार्टीचे नेते अखिलेश यादव यांनी, संविधान हा लोकशाहीचा आत्मा असल्याचं सांगितलं, तर तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांनी गेल्या दहा वर्षात देशाची धर्मनिरपेक्ष वीण उसवत चालल्याची टीका केली.
संयुक्त जनता दलाचे नेते केंद्रीय मंत्री राजीवरंजन ऊर्फ लल्लनसिंह यांनी यावेळी बोलतांना, संविधानामुळे समाजाच्या सर्वच घटकांसाठी सामाजिक तसंच आर्थिक प्रगतीच्या कक्षा रुंदावतात, असं सांगितलं. आणिबाणी लागू करणं तसंच परिच्छेद ३५६ चा दुरुपयोग करण्याबद्दल काँग्रेसवर टीका केली.

****

संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्याला काल २३ वर्षं झाली. या हल्ल्यात वीरमरण आलेले सुरक्षा रक्षक आणि कर्मचाऱ्यांना काल संसद परिसरात राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी अभिवादन केलं. संसदेच्या दोन्ही सभागृहातही मौन पाळून या हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आलं.

****

भविष्यात मुंबई फिन-टेकची राजधानी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. काल मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमधे वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचं उद्घाटन करतांना ते बोलत होते. २०२८ ते २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट राज्य सरकार पूर्ण करेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राला भारताचे पॉवर हाऊस म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले…

> ***‘‘हमारे देश में केवल आर्थिक और सामाजिक ने तो सांस्कृतिक पुनरुत्थान भी हमारे प्रधानमंत्री जी के नेतृत्व मे हो रहा है। ये सारी चीज से मिलाकर भारत को एक मजबूत देश के रूप मे प्रस्थापित कर रही है। और ऐसे समय इस भारत के पॉवर हाऊस के रूप में महाराष्ट्र को प्रस्थापित करने का काम करेंगे.’’***

****

येत्या युवा दिनी अर्थात १२ जानेवारी रोजी शिर्डी इथं भारतीय जनता पक्षाचं प्रदेश अधिवेशन होणार आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल मुंबईत

ही माहिती दिली. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त येत्या काळात तरूणाईसाठी विशेष अभियान सुरू करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४च्या सॉफ्टवेअर फेरीत राज्यातल्या संघांनी चमकदार कामगिरी केली आहे. या फेरीत कन्व्हर्सेशनल इमेज रेकग्निशन चॅटबॉट`, `महिला सुरक्षा`, `ट्रॅफिक व्यवस्थापनासाठी एआय आधारित उपाय`, `लाइव्ह लोकेशन ट्रॅकिंग आदी मुद्यांवर या संघांनी उपाय शोधण्याचा प्रयत्न केला. यात मुंबईच्या वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, नागपूरच्या यशवंतराव चव्हाण इंजिनिअरिंग, नवी मुंबईतल्या दत्ता मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या जेएनईसी तसंच राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बक्षीसं पटकावल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

दत्त जयंती आज साजरी होत आहे. या निमित्तानं नांदेड जिल्ह्यात माहूर गडावरच्या दत्तशिखरासह ठिकठिकाणच्या दत्तमंदिरांमध्ये विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

अंबड इथं दत्तजयंती संगीत महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. सामगायनानं प्रारंभ झालेल्या या तीन दिवसीय संमेलनात आज आणि उद्या दररोज दोन सत्रांत मान्यवर कलावंतांकडून गायन, वादन तसंच नृत्य सादरीकरण होणार आहे. पंडित गोविंदराव जळगावकर नाट्यगृहात होत असलेल्या या संगीत महोत्सवाचं हे शतकपूर्ती वर्ष आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाला आजपासून सुरुवात होणार आहे. डॉ. शिरीष खेडगीकर यांच्या हस्ते या संमेलनाचं उद्घाटन होणार असून समारोप डॉ. आदित्य पतकराव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी ही माहिती दिली. साहित्यिक बालाजी सुतार हे या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत.

****

बीड जिल्ह्यात मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभाग-सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी ही माहिती दिल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे...

***‘‘संतोष देशमुख यांचं गेल्या सोमवारी नऊ डिसेंबरला अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, या गुन्ह्यातील आरोपी जयराम माणिक चाटे तसंच महेश सखाराम केदार या दोघांना, १० डिसेंबर रोजी धाराशिव जिल्ह्याच्या हद्दीमधून तर अन्य एक आरोपी प्रतिक भिमराव घुले यास ११ डिसेंबर रोजी पुण्यातून अटक करण्यात आली. आता या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून होणार आहे.’’***

रवी उबाळे आकाशवाणी बातम्यांसाठी बीड..

खासदार बजरंग सोनवणे यांनी या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे द्यावा, तसंच हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावं, अशी मागणी केली आहे. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी काल केज तहसील कार्यालयात बैठक घेऊन, सदर प्रकरणाचा जलद गतीने करण्याचे निर्देश दिले.

दरम्यान, मराठा समाजाच्या वतीने काल बीड जिल्ह्यात बंद पुकारण्यात आला. बीड शहरासह जिल्हाभरात सर्व ठिकाणी बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला.

****

परभणी इथल्या अप्रिय घटनेच्या निषेधार्थ काल जालना इथं धरणे आंदोलन करण्यात आलं. संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करावी तसंच परभणी इथं पोलीस प्रशासनाकडून होत असलेल्या कारवाया थांबवण्यात याव्यात, अशी मागणी उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

परभणी इथल्या अप्रिय घटनेप्रकरणी मुख्य सूत्रधाराविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा आणि आंबेडकरवादी कार्यकर्त्यांविरोधातले दाखल गुन्हे मागे घेण्यात यावेत, अशी मागणी, बीड इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स सोशल फोरमच्या वतीने करण्यात आली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना याबाबतचं निवेदन देण्यात आलं.

दरम्यान, परभणी बंद काळात वृत्तपत्र कार्यालयास पोलीस संरक्षण देण्यात यावं, अशी मागणी परभणी जिल्हा पत्रकार संघाने केली आहे. काही समाज कंटकांनी दमदाटी करत कार्यालय बंद करण्याचा प्रयत्न केल्याच्या पार्श्वभूमीवर पोलिस संरक्षण पुरवण्याबाबतचं निवेदन जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आलं आहे.

****

जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने काल समृध्दी महामार्गावर कारवाई करत गुटखा आणि  कंटेनर असा एकूण एक कोटी २ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी कंटेनर चालक इरफान रहीम सय्यद याच्यासह अन्य दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

****

नागरिकांनी ध्वजदिन निधीमध्ये आपले योगदान देवून जिल्ह्यात जास्तीत जास्त ध्वजदिन निधी संकलित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असं आवाहन लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केलं आहे. त्या काल ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमात बोलत होत्या. सैनिकांसाठी विविध उपक्रम राबवण्यात, लातूर जिल्हा प्रशासन यापुढेही पुढाकार घेत राहील, असं जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या कृषी विज्ञान केंद्रात काल ड्रोन विषयी माहिती आणि प्रात्यक्षिक कार्यशाळा घेण्यात आली. शेतकरी तसंच कृषी विषयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्राचे विषयतज्ज्ञ दत्ता पाटील तसंच प्राध्यापक गीता यादव यानीं सविस्तर माहिती दिली.

****

पर्जन्य जलपुनर्भरण प्रकल्पातून भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नक्की सुटेल, असा विश्वास निवृत्त कर्नल शशिकांत दळवी यांनी व्यक्त केला आहे. धाराशिव जिल्ह्याच्या कळंब तालुक्यात वडगाव जहागीर इथं या प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यात ते काल बोलत होते. तालुक्यातल्या ३१ गावात शासकीय इमारती, शाळा, वाचनालयं, तसंच सभागृहांच्या छतावर जवळपास एक हजार सत्तावीस ठिकाणी पर्जन्य जलपुनर्भरण यंत्रणा बसवण्यात आली आहे.

****

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व जिल्ह्यांमध्ये १६ ते २० डिसेंबर या कालावधीत कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र-कुसुम हे अभियान राबवण्यात येणार आहे, लातूर इथं आशा कार्यकर्त्या आणि पुरुष स्वयंसेवक यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष सर्वेक्षण होणार आहे. कुष्ठरुग्णांच्या सहवासातल्या व्यक्तींना खबरदारी म्हणून औषधाची एक मात्रा यावेळी देण्यात येईल, त्यामुळे घरी येणाऱ्या पथकामार्फत तपासणी करून घेण्याचं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

****

क्रिकेट

बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना नुकताच सुरू झाला आहे. ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेन इथं सुरू असलेल्या या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. अखेरचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या बिनबाद २४ धावा झाल्या होत्या. मालिकेत दोन्ही संघ एक एक सामना जिंकून बरोबरीत आहेत.

****